# ई - पोलीस पत्रिका

दि. २४/०६/२०२४ अनु.क्र.११२

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

# भाग-१
## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## रजा

**०१.पोआअ/आस्था-५/सेवानिवृत्त रजा/५२७९/२०२४ अमरावती शहर दिनांक १४/०६/२०२४**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार हे त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या दिनांकास नियत वयोमानाने सेवानिवृत्त होणार असल्याने त्यांनी सेवानिवृतिपुर्व रजा मंजुरी बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

| अ.क्र. | अंमलदारांचे नाव,पदनाम,ब.न | नेमणुक | नियत वयोमानाने सेवानिवृत्त दिनांक | मागणी केलेली रजा |
|---|---|---|---|---|
| १ | सपोउपनि/८०० मोहन मार्कड | मोपवि | ३१/१०/२०२४ | ३० दिवस |
| २ | सपोउपनि/७६२,गजानन खुरकटे | पोलीस मुख्या. | ३०/०९/२०२४ | ३० दिवस |

उपरोक्त पोलीस अंमलदार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियम ६६ (१) तरतुदीनुसार आणि प्रशासकीय कामाची निकड व त्यांचे सेवेची आवश्यकता विचारात घेवुन वरील प्रमाणे सेवानिवृत्तीपुर्व रजा मंजुर करण्यात येत आहे.तरी त्यांना यापुढे रजा वाढवुन देण्यात येणार नाही हयाची नोंद घ्यावी.

## प्रशिक्षण

**०१.पोआअ/पशा-१/प्रशि./DGP-IGP परि./५६७४/२०२४ अमरावती शहर दिनांक १४/०६/२०२४**

**संदर्भ :-** - मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांचे पत्र क्र. पोमसं/प्रशि/१/DGP/IGP Conf/२०२३/५७२ दिनांक ०८.०५.२०२४ .

**विषय :-**डिजीपी-आयजीपी परिषद-२०२३ बाबत.

## आदेश

उपरोक्त संदर्भीय विषायान्वये नविन कायदा अंमलबजावणी करण्याकरीता पोलीस आयुक्त स्तरावर खालिलप्रमाणे समितीगठीत करणेबाबत सुचित केले आहे. तसेच सदर नवीन कायदा अंमलबजावणीकरीता TOT / मास्टर ट्रेनरतयार करावे व त्यांच्या मार्फतीने सर्वांना प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच नवीन कायदा अंमलबजावणीबाबत आपल्या अधिनस्त समितीच्या प्रमुखसुचनांचा अहवाल पाठविणेबाबत निर्देश दिलेले आहे.

त्यानुषंगानेनविन कायदा अंमलबजावणी करण्याकरीता पोलीस आयुक्त, अमरावती शहर स्तरावर खालिलप्रमाणे समितीगठीतकरण्यात येत आहे.

| अध्यक्ष | श्री. नविनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त, अमरावती शहर |
|---|---|
| **सदस्य -**<br>**अपर पोलीस आयुक्त/ पोलीस उपआयुक्त** | १) श्रीमतीकल्पना बारवकर,<br>पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), अमरावती शहर<br>२) श्री. गणेशशिंदे,<br>पोलीस उपआयुक्त (परिमंडळ-२),अमरावती शहर |
| **सदस्य -**<br>**सहायक पोलीस आयुक्त** | १) श्री. प्रशांत राजे,<br>सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), अमरावती शहर<br>२) श्री. शिवाजी बचाटे,<br>सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा), अमरावती शहर |
| **सदस्य -**<br>**पोलीस निरीक्षक** | १) श्री. राहुल आठवले ,<br>पोलीस निरीक्षक - गुन्हे शाखा, अमरावती शहर<br>२) श्री. गोरखनाथ जाधव,<br>पोलीस निरीक्षक- कल्याण शाखा, अमरावती शहर |

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

### शिक्षा

**०१.पोआअश/विचौ-१/निलंबन पोउपनि श्री.केवटी + २/५८०६/२०२४ अमरावती शहर दि.२१/०६/२०२४**

### निलंबन आदेश

१. ज्या अर्थी तुम्ही१) श्री मोहन पुंजाराम केवटी, पोलीस उपनिरीक्षक २) पोशि/५७४ महेश मोहन शर्मा ३) मपोशि/१६४६ मिना साहेबरावजी मुंडाले,सर्व नेमणूक - पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर येथे नेमणूकीस असून दिनांक१५/०६/२०२४ रोजी अर्जदारश्रीमती शितल चंद्रबहादूर थापा वय ३० वर्ष रा.नेपाळ, ह.मु. कठोरा नाका, अमरावती यांनी दिलेल्या तक्रार अर्जामध्ये नमूद १ ते ३ पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी पो.स्टे. ला चौकशी कामी आणून विचारपूस करुन मारहाण केल्या बाबत आरोप केल्या बाबतचा तक्रार अर्जाचे अनुषंगाने तुम्ही खालील प्रमाणे कसुरी केली आहे.

१) तुम्ही दखलपात्र गुन्हया बाबत उपरोक्त अर्जदार यांच्या प्राप्त अर्जावर कायदेशिर पध्दतीचा अवलंब करणे,तसेच गुन्हा नोंद करुन तपास करणे गरजेचे होते, तथापि तसे न करता सदर बाब दुर्लक्षीत केल्याचे दिसुन आले आहे.

२) पोलीस स्टेशनला कोणताही गुन्हा दाखल नसतांना फक्त तक्रार अर्जावर गैरअर्जदार महिलेला गाडी मध्ये बसवुन चौकशी करीता पोलीस स्टेशनला आणुन बसवुन ठेवले. तसेच गैरअर्जदार यांना कोणतीही नोटीस न देता पोलीस स्टेशनला चौकशीकरीता आणले, ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

३) दिनांक ९.६.२०२४ रोजी गैरअर्जदार महिलेला पोलीस स्टेशला विचारपुस करण्या करीता आणल्या नंतर त्याची रितसर स्टेशन डायरीला नोंद घेणे आवश्यक होते, तथापी स्टेशन डायरीला नोंद घेण्यात आली नाही. परंतु गैरअर्जदार महिलेला चौकशी केल्या नंतर तिला तीचे पतीसह पोलीस स्टेशन मधुन परत पाठवितांना

दि.९.६.२०२४ रोजी सायंकाळी १८.५७ मिनिटांनी अर्जदार सातपुते यांचे घरातील मंगळसुत्र चोरी गेल्याबाबत चौकशी केल्या बाबतची नोंद स्टेशन डायरीला घेण्यात आली आहे.

२. श्री मोहन पुंजाराम केवटी, पोलीस उपनिरीक्षक, पोशि/५७४ महेश मोहन शर्मा, मपोशि/१६४६ मिना साहेबरावजी मुंडाले, सर्व नेमणुक पोलीस स्टेशन गाडगे नगर, अमरावती शहर यांनी उपरोक्त नमुद केल्या प्रमाणे प्रस्तुत प्रकरणा मध्ये कायदेशिर तरतुदीचा अवलंब करुन कार्यवाही केली नाही. त्यांनी त्यांचे कर्तव्यात बेजबाबदारपणा व निष्काळजीपणा केला आहे.

३. त्याअर्थी आता मुंबई पोलीस कायदा १९५१ मधीलकलम २५ मधील १ (ख) आणि मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (अ-२) च्या तरतुदीनुसार, तसेच विभागीय चौकशी नियम पुस्तीका 1991 मधील प्रकरण दोन मधील नियम २.२ (अ) च्या तरतुदी नुसार आदेशाच्या दिनांका पासुन शासन सेवेतुन निलंबित करण्यात येत आहे.

४. त्यानुसार असेही आदेश देण्यात येत आहे की, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वियेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकने यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ६८(एक) (अ) नुसार निर्वाह भत्ता व त्यावरील अनुज्ञेय महागाई भत्ता देण्यात येईल.

५. आणखी असेही आदेश देण्यात येत आहेत की, जोपर्यंत निलंबनाचे आदेश अस्तित्वात असतील तो पर्यंत श्री मोहन पुंजाराम केवटी, पोलीस उपनिरीक्षक, पोशि/५७४ महेश मोहन शर्मा व मपोशि/१६४६ मिना साहेबरावजी मुंडाले,यांचे मुख्यालय, पोलीस मुख्यालय,अमरावती शहरहे राहील. निलंबन काळात त्यांना दररोज आपल्या मुख्यालयात हजेरी देणे अनिवार्य राहील. तसेच त्यांना पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. पोलीस आयुक्त,अमरावती शहर यांच्या पुर्व परवानगी शिवाय त्यांनी मुख्यालय सोडल्यास ती त्यांची गैरवर्तणुक ठरेल व त्या कारणासाठी वेगळया शिस्तभंगाच्या कारवाईस ते पात्र ठरतील.

६. सदर निलंबनाचा आदेश अस्तित्वात असे पर्यंत आपणास कोणत्याही प्रकारचा खाजगी उद्योग अथवा नोकरीकरता येणार नाही. जर या कालावधीत कोणतीही खाजगी नोकरी अथवा उद्योग केल्याचे आढळुन आल्यास आपणा विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल.

**भाग-३**

**<u>वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण</u>**

**<u>निरंक</u>**

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस